**<u>सं. फौ. खटला क्र.११६/२०१७</u>**
**<u>निशाणी क्र. (७७)</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::</u>**
**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : दशरथ साधुराम माने,

**<u>वय</u>** : ४५ वर्षे, **<u>धंदा</u>** : मजुरी,

**<u>राहणार</u>** : कोणाळी, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

०१. दि.२१/०१/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता मी माझ्या घरून शेतात जात होतो. त्यावेळी गावाच्या दक्षिणेस असलेल्या डी.पी. जवळ माझे वडील साधूराम यांचा अपघात झाला होता. त्यावेळी त्यांचा डावा हात व डावा पाय मोडले होते. मी त्यांचे सोबत होतो. त्यावेळी आरोपी प्रताप नादरगे हा उदगीर कडून गाडी क्र.एम.एच.–२४ डब्ल्यू.–३९४२ ही घेऊन आला आणि माझ्या वडिलांना धडक दिली. मी दुसऱ्या वाहनाने माझ्या वडिलांना उदगीर येथील दवाखान्यामध्ये नेले. तेथे उपचारादरम्यान माझ्या वडिलांचा डावा हात व डावा पाय मोडल्याबाबत मला समजले. आरोपी प्रताप न्यायालयामध्ये हजर आहेत. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपी तर्फे उलटतपासणी वकील श्री. एस.एम. बिराजदार यांचेमार्फत ::</u>**

०२. मला एकूण पाच भाऊ आहेत. त्यापैकी माझे तीन भाऊ हयात आहेत. नमूद अपघाताच्या वेळी माझे चार भाऊ हयात होते. रामेश्वर तुकाराम माने आणि लक्ष्मीकांत तुकाराम माने हे माझे पुतणे आहेत. सुकुमारबाई ही माझी पत्नी आहे. ग्यानोबा साधुराम माने व नामदेव साधुराम माने हे माझे भाऊ आहेत. त्यापैकी नामदेव साधुराम माने हे मयत आहेत. नमूद डी.पी. गावाजवळच आहे. अपघाताचे ठिकाण हे देवणी ते उदगीर या रोडवरील आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोडवर नेहमी वाहनांची वर्दळ असते. उदगीर ते कमलवाडी, उदगीर ते देवणी या बसेस सदर ठिकाणावरून येतात व जातात. हे म्हणणे खरे आहे की, देवणी ते उदगीर या रस्त्यालगत माझे गाव आहे, त्या रस्त्यावरून माझ्या गावात जाण्यासाठी रस्ता आहे व तेथे नेहमी, पाच–पंचवीस लोक हजर असतात. नमूद अपघाताची घटना गावातील लोकांनी बघितलेली नाही.

०३. नमूद घटनेची चौकशी करण्याकरिता पोलीस दवाखान्यामध्ये आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ नुकसान भरपाई मिळण्यासाठी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या वडिलांना गाडीने धडक दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि. ०३/०७/२०२५.

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.